# प्रेसनोट

दि.२२/०४/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | कोतवाली पो.स्टे.,जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७(अ) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | महेश गोविंद महांडुळे, वय–४२ वर्ष, धंदा–खाजगी इसम, मुळ राहणार रुईखेल, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर हल्ली मुक्काम–राजवर्धन बिल्डींग, फ्लॅट नं.३, सारसनगर, अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ४,००,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३,५०,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांनी त्यांचे गावातील भैरवनाथ विविध कार्यकारी सह. सोसायटीचे सचिव यांचे विरुध्द केलेल्या तक्रारीवरुन जिल्हा उपनिबंधक यांनी सचिव यास निलंबित केले होते. सचिव यास निलंबनातुन मुक्त करुन पुन्हा सेवेत न घेता त्यास सेवेतुन बडतर्फ करण्याचे आदेश जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडुन काढणेसाठी, जिल्हा उपनिबंधक यांचेशी ओळख आहे असे सांगुन त्यांचे नावाने यातील आरोपी महेश गोविंद महांडुळे याने तक्रारदार यांचेकडे ४,००,०००/– रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेकडे दिलेल्या तक्रारीवरुन दि.२१/०४/२०२२ रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये आरोपी महेश गोविंद महांडुळे याने पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडे ४,००,०००/– रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदार यांचेकडे ३,५०,०००/– रुपये एवढीच रक्कम असलेने आज दि.२२/०४/२०२२ रोजी अहमदनगर येथील महात्मा फुले चौक येथील पांडळे यांचे खाजगी गाळयाजवळ लाचेचा सापळा आयोजित केला असता आरोपी महेश गोविंद महांडुळे याने तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष ३,५०,०००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारली असता आरोपी महांडुळे यास रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत कोतवाली पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

22/04

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर